मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# लाखो-करोडोंचा चुराडा! बंगले पाडण्याचे सुप्रीम कोर्टाचे आदेश

## पिंपरी-चिंचवडमधील 29 बंगले पाडण्याचे सुप्रीम कोर्टाचे आदेश : पूररेषेत प्लॉटिंगवर लाखो रुपये खर्चून नागरिकांनी बंगले बांधले आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदी पात्रालगतची जाधववाडी चिखली येथील अनधिकृत २९ बंगले कायमचे जमीन दोस्त करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने जाहीर केला आहे. त्यामुळे महापालिकेकडून कारवाई केव्हा होणार? याची प्रतीक्षा आहे. दरम्यान, या बंगल्यांसह परिसरातही बांधकामे आणि काही बंगल्यामध्ये अंतर्गत कामे सुरू असल्याचे बुधवारी आढळले.

पिंपरी-चिंचवड शहराच्या उत्तरेकडून इंद्रायणी नदी वाहते. तिच्या पूररेषेत प्लॉटिंग करून जागेची विक्री केली आहे. त्यावर लाखो रुपये खर्चून नागरिकांनी बंगले बांधले आहेत. तीन-चार मजली घरे सुद्धा आहेत. याबाबत पर्यावरण प्रेमी वकील तानाजी गंभीरे यांनी राष्ट्रीय हरित लवादाकडे दाद मागितली होती. लवादाने सर्व बंगले पाडण्याचा आदेश दिला होता. या निर्णयाच्या विरोधात संबंधितांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने हरित लवादाचा निर्णय कायम ठेवला आहे. त्यामुळे महापालिका काय भूमिका घेते, याकडे लक्ष आहे.

संबंधित डेव्हलपर्स यांनी पर्यावरण अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केले आहे. पर्यावरण कायदा १९८६, जल (पी आणि सीपी) कायदा १९७४ आणि वायू (पी आणि सीपी) अधिनियम १९८१च्या तरतुदींचे उल्लंघन करून आर्थिक फसवणूक केली. त्यामुळे पुण्यातील हरित लवादाकडून बांधकामे पाडण्याचे आदेश दिले होते. हे क्षेत्र पुन्हा मूळ स्थितीत आणण्याचा आदेश पारित करण्यात आला. संबंधितांना पर्यावरण नुकसान भरपाई (ईडीसी) साठी पाच कोटी रुपयांचा दंड देखील ठोठावला आहे.



### आढळलेली स्थिती

- » बंगल्यासंदर्भात उघडपणे बोलायला कोणीही तयार नाही.
- » नाव न छापण्याच्या अटीवर, आमची फसवणूक झाल्याचे दोघांनी सांगितले.
- » प्लॉट खरेदी-विक्री किंवा घराची नोंदणी करताना संबंधित अधिकाऱ्यांनी सांगायला हवे होते.
- » नदीच्या बाजूला पत्रा लावून कुंपन केलंय.
- » नदी किनारी चिखली, मोशी, चऱ्होलीतही बांधकामे सुरू.
- » इंद्रायणीप्रमाणे मुळा व पवना नदीच्या काठांवरही बांधकामे.

### वास्तव

- » प्रतिप्लॉट १८ ते २० लाख रुपये गुंठा, याप्रमाणे खरेदी-विक्री झालीय.
- » बंगले असल्याने किमान ७० लाखांपेक्षा अधिक बांधकाम खर्च केलाय.
- » ड्रेनेज लाइन व नळजोड महापालिकेने, तर महावितरणने वीजजोड दिलेत.
- » निबंधकांकडील नोंदीचे सातबारा उतारे नागरिकांकडे आहेत.
- » वर्षाला सुमारे २८ हजार रुपये मिळकतकर भरल्याचे रहिवाशांनी सांगितले.
- » महापालिकेने दोन महिन्यांपूर्वी प्रत्येक बंगल्याला गृहक्रमांक दिले आहेत.

# युवकांना महापालिकेच्या विविध विभागात कार्य प्रशिक्षण घेण्याची संधी

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत 12 वी, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या सुमारे 575 युवकांना संधी मिळणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत 12 वी, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या सुमारे 575 युवकांना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध विभागात कार्य प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिली.

युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळविण्याची तसेच उद्यमशीलता क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" सन 2024-25 या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यास राज्यशासनाने मान्यता दिली आहे. या योजनेची अंमलबजावणी पिंपरी चिंचवड महापालिका करणार असून त्यानुसार महापालिकेच्या विविध विभागात सुमारे 575 युवकांना कार्य प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे.



या योजनेसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत असून 18 ते 35 या वयोगटातील 12 वी, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या युवकांनी ROJGAR.MAHASWAYAM.GOV.IN या शासनाच्या अधिकृत पोर्टलवर जाऊन आपले अर्ज ऑनलाईन पद्दतीने सादर करावे, असे जांभळे पाटील म्हणाले. युवकांना या योजनेचा अर्ज भरण्यासाठी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या ठिकाणी सुविधा केंद्र उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच सर्व सेतू सुविधा केंद्रांच्या ठिकाणी आणि मोबाईलद्वारे या योजनेचा अर्ज भरण्याची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

> युवक वर्ग आपले शिक्षण पूर्ण करून दरवर्षी मोठ्या संख्येने नोकरी, व्यवसाय यांच्या शोधात बाहेर पडतो. अशा बहुतांश युवकांना व्यवसाय व नोकरी संबंधित अनुभवाचा अभाव असल्याने व्यवसाय सुरु करणे अथवा नोकरी प्राप्त करण्यामध्ये अडचणींना सामोरे जावे लागते. युवकांना प्रत्यक्ष कार्याचा अनुभव देऊन त्यांच्यात रोजगाराबाबत सर्व क्षमता निर्माण करण्यासाठी महापालिका ही योजना प्रभावीपणे राबविणार आहे.
>
> \- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

> महापालिकेच्या आस्थापनेवर मंजूर असलेल्या एकूण पदांच्या 5% पदे "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत तात्पुरत्या कालावधीसाठी भरण्यात येणार आहेत. त्यानुसार विविध विभागांच्या मागणीनुसार एकूण 575 जागा भरण्यात येणार आहेत.
>
> \- प्रदीप जांभळे पाटील,अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# आम्ही उत्सवासाठी तयार, पण सर्वांना समान न्याय द्या

## गणेश मंडळांची भूमिका : आवाजाची मर्यादा लॉक करण्यासाठी प्रयत्न करावेत भूमिका गणपती मंडळांच्या प्रतिनिधींनी महापालिकेत झालेल्या बैठकीत मांडली

**पुणे | प्रतिनिधी**

आम्ही उत्सवासाठी तयार, परंतु न्याय सर्वांना समान द्या, अशी भूमिका गणपती मंडळांच्या प्रतिनिधींनी महापालिकेत बुधवारी झालेल्या बैठकीत मांडली. पुणे, पोलिस आणि प्रशासनाने गणेशोत्सवाच्या संदर्भात केलेल्या नियमांचे पालन हे सर्वच मंडळांनी केले पाहिजे.

आम्हांलाही ध्वनी प्रदूषण नको आहे, ढोल – ताशा पथकासंदर्भातील नियमावलीचे पालन केले जात नाही, अशी कैफीयतही काही कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

दरवर्षी प्रमाणे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश मंडळ, स्वयंसेवी संस्था यांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावली होती. या बैठकीला शहराच्या विविध भागातील रहिवासी संघाचे प्रतिनिधी, पर्यावरणप्रेमी संस्थांचे प्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिक, डॉक्टर उपस्थित होते.

महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पोलिसांच्या विशेष शाखेचे उपायुक्त हिंमत जाधव, उपायुक्त संदीपसिंह गिल्ल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत ध्वनी प्रदूषण, वाहतूक कोंडी, वर्षभर निघणाऱ्या विविध मिरवणुकांमुळे नागरीकांना होणारा त्रास, रुग्णवाहिकांना न मिळणारी वाट, ढोलताशांच्या पथकांच्या सरावामुळे दोन महिने आवाज सहन करावे लागत असल्याच्या तक्रारी यावेळी मांडण्यात आल्या. सरावाच्या दिवस आणि ठिकाणांबाबत नियमावली तयार करावी, यावेळी करण्यात आली. मंडळाच्या कार्यकर्त्यांना वेगळ्या नजरेतून पाहिले जात असल्याची खंत संदीप काळे, गणेश घोष यांनी व्यक्त केली. अनेक सामाजिक कामे मंडळे करतात, तर त्यांच्या कामाचे कौतुक केले पाहिजे, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.



### प्रशासनाचे म्हणणे – डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका

- ध्वनीप्रदूषणाच्या बाबतीत मंडळांनी नियम पाळावेत.
- ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारीसाठी नंबर जाहीर केला जाईल.
- मंडळाच्या उत्पन्नासाठी जाहीरातीसाठी धोरण केले जाईल.
- पूर्वीचे सर्व निर्णय कायम राहतील.
- कमानीमुळे रस्त्याची रुंदी कमी होणार नाही याची काळजी घेऊ, स्वच्छतागृहांची स्वच्छता केली जाईल.
- फूटपाथ आणि रस्त्यावर अतिक्रमणे काढली जातील.
- वाहतूक, सीसीटीव्ही, तात्काळ प्रतिसाद पथक, मेट्रोसंदर्भातील सूचना योग्य असून, त्यावर कार्यवाही केली जाईल

### पर्यावरणप्रेमी, डॉक्टर आदींच्या प्रतिक्रिया

- ढोल ताशाची संख्या कमी करा, नियमावली तयार करावी.
- कार्यकर्त्यांचे प्रबोधन करा.
- डीजे आणि लेजर लाइटच्या वापराला मनाई करा.
- रुग्णालय परिसरात आवाज नको.
- रुग्णवाहिका, डॉक्टर, नर्स यांना वेळेत पोहोचणे आवश्यक.
- वैद्यकीय उपचार वेळेत न मिळाल्याने रुग्णाचा मृत्यू झाला तर जबाबदार कोण ?
- आवाजामुळे हृदय रोग आणि रक्तदाबाचे रुग्ण वाढतात.
- सायलेंट झोनमध्ये मंडळांना परवानगी देऊ नये.
- अश्लील गाणी वाजवू नये.

### कार्यकर्त्यांच्या सूचना

- पथकाची संख्या मर्यादित ठेवा.
- दिशादर्शक फलक लावावेत.
- पार्किंगची व्यवस्था करावी.
- रुग्णालय परिसरात आवाज नको.
- सार्वजनिक शौचालये स्वच्छ ठेवावी, मोबाइल टॉयलेट उपलब्ध करावेत.
- परवानगीसाठी एक खिडकी योजना राबवावी.
- महावितरणने घरगुती दराने वीजबील आकारावे.
- सायलेंट झोनमध्ये मंडळांना परवानगी देऊ नये.
- ढोल ताशा पथक, ध्वनी क्षेपक आदी नियमांबाबत समान न्याय ठेवा.

# येरवडा मध्यवर्ती कारागृहात दोन नव्या कारागृहांचा प्रस्ताव

## मध्यवर्ती कारागृहातील तीस बराकींमध्ये 2,323 क्षमता असताना तब्बल साडेसहा हजार कैदी राहात असल्याची प्रशासनाची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

येरवडा मध्यवर्ती कारागृहातील तीस बराकींची कैदी क्षमता २,३२३ असताना येथे तब्बल साडेसहा हजार कैदी दाटीवाटीने राहात आहेत. त्यामुळे खुल्या कारागृहाच्या शेजारील तीस एकर जागेत प्रत्येकी चार हजार कैदी क्षमता असलेले दोन कारागृह बांधण्याचा प्रस्ताव कारागृह प्रशासनाने राज्य सरकारला दिला आहे.

आठ हजार कैदी क्षमतेची दोन कारागृहे केवळ कच्च्या कैद्यांसाठी बांधण्याचा हा प्रस्ताव आहे. महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण महामंडळ या दोन कारागृहांचे बांधकाम करणार आहे. तसा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविल्याची माहिती कारागृह प्रशासनाने दिली.

कारागृहातील सर्कल एक, तीन आणि टिळक यार्डात प्रत्येकी आठ बराकी आहेत. सर्कल दोनमध्ये सहा तर किशोर विभागात तीन बराकी आहेत. यासह अंडासेल, फाशीची शिक्षा सुनावलेले कैदी, रुग्ण कैदी, ज्येष्ठ नागरिक कैदी, विदेशी कैदी अशांना दाटीवाटीने विविध बाराकींमध्ये ठेवले आहे. यातील सुमारे सत्तर टक्के कच्चे कैदी आहेत. त्यामुळे तीन वर्षांपूर्वी कच्च्या कैद्यांची संख्या विचारात घेता त्यांच्यासाठी स्वतंत्र कारागृहाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने कारागृह प्रशासनाच्या संमतीने राज्य सरकारकडे पाठविला होता.

आता कैद्यांची पुढील काही वर्षांतील संख्या विचारात घेता चार हजार क्षमतेच्या प्रत्येकी दोन कारागृहांची आवश्यकता आहे. यासाठी येरवडा खुल्या कारागृहाची काही एकर जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कारागृहाच्या प्रशासनाच्या सोईनुसार येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या शेजारीच ही दोन प्रशस्त कारागृो बांधण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. येरवडा मध्यवर्ती कारागृहात केवळ शिक्षा झालेले पक्के कैदी ठेवले जाणार आहेत.



### येरवड्यात जिल्हा फौजदारी न्यायालयाचे काम सुरु

- विमानतळ रस्त्यावरील सर्व्हे क्रमांक १९१ , बंगला क्रमांक ४ येथील आठ हजार चौरस मीटरमध्ये जिल्हा फौजदारी न्यायालयाची बहुमजली इमारत होत आहे. यामध्ये दोन तळमजली वाहनतळ असून आठ मजली इमारतीत २४ न्यायालये असणार आहेत. प्रमुख जिल्हा न्यायाधिशांमार्फत १८० कोटी रूपयांच्या निधीचा प्रस्ताव राज्य सरकारला पाठविला होता. निधी मंजूर झाल्यामुळे फौजदारी न्यायालयाचे काम सुरू झाले आहे, अशी माहिती कारागृह प्रशासनाने दिली.

### नवीन कारागृह आठ हजार कैदी क्षमतेचे

- येरवडा मध्यवर्ती कारागृह - ६५ एकरात २,३२३ बंदी क्षमता.
- नवीन कारागृह - ३० एकर : तळ आणि पहिला मजला (४००० बंदी क्षमतेचे दोन कारागृह).
- सराईत गुन्हेगारांसाठी - अतिसुरक्षित ३० खोल्या.
- रुग्णालय परिसरात आवाज नको.
- बाहेरील सिमाभिंत २१ फूट तर आतील सिमाभिंत दहा फूटी उंचीची.

# महापालिकेकडून खड्डे बुजविण्याच्या कामाला गती

## शहरातील खड्डे बुजविण्याचे काम युद्धपातळीवर सुरु : 989 खड्डे बुजविल्याचा महापालिकेचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवर असलेले खड्डे बुजविण्यासाठी विशेष पथकाद्वारे युद्धपातळीवर काम सुरू असून नागरिकांकडून प्राप्त झालेल्या खड्डयांबाबतच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्या आहेत.

शहरातील आढळून आलेल्या खड्डयांपैकी महापालिकेच्या वतीने आतापर्यंत सुमारे ९८९ खड्डे बुजविण्यात आले असून क्षेत्रीय कार्यालयनिहाय ८ स्वतंत्र पथकांमार्फत खड्डे बुजविण्याची कार्यवाही युद्धपातळीवर सुरू आहे. तसेच उर्वरित खड्डे तातडीने बुजविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. खड्डे बुजविण्यासाठी नेमलेल्या पथकाने सर्व भागांची पाहणी करून बुजविलेल्या खड्डयांबाबतचा दैनंदिन अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तर कोणत्याही भागात खड्डयांबाबत आलेल्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याचे निर्देश सर्व पथकांना देण्यात आलेले आहेत, अशी माहिती शहर अभियंता मकरंद निकम यांनी दिली आहे.



महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावर खड्डे बुजविण्यासाठी फिरते पथके नेमण्यात आले आहेत. तसेच क्षेत्रीय अधिकारी आणि स्थापत्य कार्यकारी अभियंता यांच्या आधिपत्याखाली असलेले संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत परिसरातील रस्त्यांची पाहणी करून खड्डे बुजविण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. रस्त्यांमध्ये आढळून आलेले खड्डे बुजविणे, पाण्याचा निचरा करण्यासाठी मार्ग करून देण्याबाबतची कार्यवाही पथकांमार्फत जलदगतीने करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, रस्त्यांवर बेकायदेशीरपणे बांधकाम साहित्य ठेवणे, अतिक्रमण करणे, राडारोडा टाकणे, रस्त्यांमध्ये बेकायदेशीरपणे खोदकाम करणे, चर खोदणे असे प्रकार आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे, असेही शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.

### किती खड्डे बुजविले?

» 'अ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील ७४, ब १३७, क ६०, ड १०७, इ ९३, फ १५८, ग ६८ आणि ह ६४ आणि स्थापत्य प्रकल्प विभागाचे २२८ असे ९८९ खड्डे बजुविल्याचा दावा महापालिकेने केला आहे.



# साडेबारा टक्के परतावा; पीएमआरडीएचा पुढाकार

## रखडलेल्या परताव्याबाबत अर्ज करण्याचे आवाहन : शासनाच्या नगर विकास विभागाकडून मिळाली परवानगी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनींच्या बदल्यात परतावा देण्याबाबत प्रशासनाकडून विलंब होत आहे. तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने काही वर्षांपूर्वी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या त्या अनुषंगाने जमीनमालकांना ६.२५ टक्के प्रमाणे परतावा देण्यास शासनाच्या नगर विकास विभागाकडून परवानगी मिळाली आहे. मात्र, या किचकट आणि गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये शेतकरी पुढे येत नव्हते, अखेर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने एक पाऊल टाकत याबाबत अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे आता तरी हा विषय सुटणार का, असा सवाल शेतकरी करत आहेत.

सन १९७२ ते १९८३ या कालावधीत तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या होत्या. संबंधित पात्र शेतकऱ्यांना ६.२५ टक्के प्रमाणे जमीन परतावा मिळण्याकामी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आकुर्डी पुणे येथे विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध आहेत. या प्रक्रियेसाठी पीएमआरडीए कार्यालयात विहीत नमुन्यातील अर्ज भरून देणे आवश्यक आहे. त्या साठी अधिकारी व कर्मचारी यांना देखील त्या प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. अर्जासोबत १९७० ते आतापर्यंतचे सातबारा उतारे फेरफार, विहित अर्जात नमूद केलेले प्रतिज्ञापत्र, पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर मूळ मालक वारसदारांनी केलेले क्षत्रिपूर्ती बंदपत्र, मूळ जमीन मालक मयत असल्यास मृत्यूचा दाखला, जमीन मालक मयत असल्यास कोर्टाचे वारस प्रमाणपत्र / ज्या फेरफार नोंदीची जमीन मालक मयत झाल्यानंतर वारसाचे नावे समाविष्ट झाली आहे त्या फेरफारचा उतारा, विशेष संपादन अधिकारी यांच्याकडील संपादनाचा मूळ दाखला, उपजिल्हाधिकारी भूसंपादन यांच्याकडून नुकसान भरपाई मिळणेकामी व संपादन दाखला मिळणेकामी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, भूसंपादन कायदा १८९४ चे कलम १८,२८,३० नुसार जमिनीचे संपादनाबाबत अथवा मोबदल्यात वाढ करण्याबाबत कोणत्याही कोर्टात दावा दाखल केलेला नाही तसेच अन्य कोणत्याही कारणास्तव कोर्टात दावा दाखल नाही अथवा असल्यास तो काढून घेतलेला आहे त्याबाबतच्या प्रतिज्ञापत्र अनिवार्य आहे.




### भूसंपादन दाखला मिळवण्यासाठी खटाटोप

» जमिनी संपादन केल्या तेव्हा भूसंपादन दाखला देण्यात येत होता. मात्र तो आता उपलब्ध नाही. शासनाच्या विभागाकडे देखील अनेक हेलपाटे मारून तो मिळत नाही. याबाबत जुने रेकॉर्ड आहे, सापडत नाही, दाखले देणे बंद केले अशी वेगवेगळी कारणे शेतकऱ्यांना सांगण्यात येतात. याबाबत अनेकदा बैठकाही झाल्या आहेत. मात्र त्यावर तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे आता खरेच शेतकऱ्यांना न्याय द्यायचा असल्यास, राज्य शासन व पीएमआरडीए यांनी सुलभ व सोईस्कर असे मार्ग काढावा.

> बाधित शेतकऱ्यांच्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्नावर सकारात्मक कार्यवाही सुरू आहे. संबंधित शेतकऱ्यांनी आवश्यक ती कागदपत्रे सादर करून परताव्याचा लाभ घ्यावा.
> - डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.

# अखेर पालिकेला आली सर्वसामान्यांची आठवण

## तब्बल तीन वर्षांनी नागरिकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी प्रशासन ॲक्शन मोडवर

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेत सुरू असलेल्या प्रशासक राजमध्ये नागरिकांच्या किरकोळ तक्रारींकडे लक्ष देण्यासाठी अधिकाऱ्यांकडे वेळच नसल्याचे अनेकदा दिसून आले होते. आता तब्बल तीन वर्षांनी प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारीकडे लक्ष देणे सुरू केले आहे.

पुणे महापालिकेत गेल्या तीन वर्षांपासून प्रशासक राज सुरू आहे. पालिकेचा सर्व कारभार हा अधिकाऱ्यांमार्फत चालवला जात आहे. अधिकाऱ्यांकडून शहरात मोठमोठे प्रकल्प राबविले जात आहेत. मात्र नागरिकांच्या किरकोळ तक्रारींकडे लक्ष देण्यासाठी कोणाला वेळ नाही. लोकप्रतिनिधी नसल्याने कोणाकडे दाद मागावी हे सामान्य व्यक्तीला समजत नाही. नागरिकांच्या तक्रारींचा डोंगर वाढत आहे. प्रशासनाचा कारभार पावसामुळे चव्हाट्यावर आला आहे.



त्या पार्श्वभूमीवर महापालिकेला शहरातील सामान्य नागरिकांची आठवण झाली असून आता ॲक्शन मोडवर आली आहे.

महानगरपालिकेने क्षेत्रीय स्तरावरील स्थानिक कामे आणि नागरी प्रश्नांचा निपटारा स्थानिक पातळीवर होत नाही. कामे होत नसल्याने नागरिक त्रासले असून आता ते थेट महापालिका आयुक्तांच्या दालनात येऊन बसत आहे. तसेच अतिरिक्त महापालिका आयुक्तांकडे गाऱ्हाणे मांडू लागले आहेत. याची दखल घेत स्थानिक प्रश्नांचा निपटारा स्थानिक पातळीवर वेळेत व्हावे, असे अपेक्षित आहे. तसेच काही स्थानिक प्रश्न मुख्य विभाग व क्षेत्रीय कार्यालय यांच्यामधील समन्वयाच्या अभावामुळेदेखील प्रलंबित राहात असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे स्थानिक कामे (क्षेत्रीय कार्यालयस्तरावर) गतीने मार्गी लावण्यासाठी सर्व क्षेत्रीय उपायुक्त (झोन १ ते ५) यांनी त्यांचे अधिनस्थ साहाय्यक महापालिका आयुक्त यांच्यासोबत प्रत्येक महिन्यातून एकदा मासिक सभा घेऊन नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिले आहेत.

### या कामांना प्राधान्य देण्याचे आदेश

क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सुरू असलेल्या विकासकामांची सद्यस्थिती, त्याबाबत मुख्य खात्यांशी समन्वय

ड्रेनेज तसेच पदपथ देखभाल दुरुस्तीविषयक कामे

साथरोग प्रतिबंधात्मक जनजागृती आणि औषध फवारणी

पथदिवे आणि पाणीपुरवठा अनुषंगिक येणाऱ्या तक्रारी

स्थानिक अतिक्रमण

### दर महिन्याला सादर करावा लागणार अहवाल

**» अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिलेल्या आदेशात उपायुक्तांना दर महिन्याला बैठक घ्यावी लागणार आहे. नमूद केलेल्या कामांचा आढावा घेऊन उद्भवणाऱ्या समस्या / प्रश्नांची सर्वसमावेशक चर्चा, स्थानिक प्रश्न तातडीने निकाली काढणे, जे प्रश्न क्षेत्रीय स्तरावर सोडविण्यास मर्यादा येत आहेत, त्याबाबत मुख्य खात्यांशी समन्वय साधावा, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच प्रत्येक बैठकीमध्ये चर्चिल्या गेलेल्या मुद्यांची माहिती अहवाल स्वरूपात अतिरिक्त महापालिका आयुक्त यांच्यामार्फत महापालिका आयुक्त यांच्याकडे दरमहा करण्यास सांगण्यात आले आहे. त्याचबरोबर पुढील मासिक बैठकीच्या वेळी मागील बैठकीतील विषयांबाबत कोणती कार्यवाही झाली त्याबाबत पाठपुरावा करावा, असेही सदर आदेशात सांगण्यात आले आहे.**

# हडपसर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक 5 लाख 90 हजार 611 मतदार

## भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमानुसार पुणे जिल्ह्यातील विधानसभा निहाय मतदारांची संख्या प्रसिद्ध

**पुणे | प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमानुसार पुणे जिल्ह्यातील विधानसभा निहाय मतदारांची संख्या प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्या प्रारूप मतदार यादीनुसार एकूण ८ हजार ४१७ मतदान केंद्रावर ८४ लाख ३९ हजार ७२९ मतदार असून त्यामध्ये ४४ लाख ३ हजार ३४४ पुरुष, ४० लाख ३५ हजार ६४० महिला आणि ७४५ तृतीयपंथीय मतदार आहेत, अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी दिली. तर जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघात ५ लाख ९० हजार ६११ मतदार आहेत. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक मतदारांची संख्या असलेला हडपसर विधानसभा मतदारसंघ ठरला आहे.

या यादीनुसार जुन्नर विधानसभा मतदासंघात ३५६ मतदान केंद्र असून १ लाख ६१ हजार ८९ पुरुष, महिला १ लाख ५३ हजार ७४४ तसेच तृतीयपंथीय ६ असे एकूण ३ लाख १४ हजार ८३९ मतदार आहेत. आंबेगाव मतदार संघात ३४१ मतदान केंद्र असून पुरुष मतदार १ लाख ५५ हजार ५५८, महिला १ लाख ४८ हजार ७०० आणि तृतीयपंथीय ८ असे एकूण ३ लाख ४ हजार २६६ मतदार आहेत.

खेड आळंदी मतदार संघात ३८९ मतदान केंद्र, पुरुष मतदार १ लाख ८५ हजार ३५९, महिला १ लाख ७१ हजार ७३४ आणि तृतीयपंथीय १२ असे एकूण ३ लाख ५७ हजार १०५ मतदार आहेत. शिरूर मतदार संघात ४५७ मतदार केंद्र, पुरुष २ लाख ३२ हजार ६३३, महिला २ लाख १२ हजार ६४६ आणि तृतीयपंथीय २१ असे एकूण ४ लाख ४५ हजार ३०० मतदार आहेत.

दौंड मतदार संघात ३१० मतदान केंद्र, पुरुष संख्या १ लाख ५८ हजार ८४०, महिला १ लाख ४८ हजार १९२ आणि तृतीयपंथीय १० असे एकूण ३ लाख ७ हजार ४२ मतदार, इंदापूर मतदार संघात ३३७ मतदान केंद्र असून १ लाख ६८ हजार ३६४ पुरुष,



१ लाख ५७ हजार १६४ महिला आणि तृतीयपंथीय १२ असे ३ लाख २५ हजार ५४० मतदार आहेत.

बारामती मतदार संघात ३८६ मतदान केंद्रे, पुरुष मतदार १ लाख ८९ हजार ७०१, महिला १ लाख ८१ हजार ८५६ आणि तृतीयपंथीय २० असे ३ लाख ७१ हजार ५७७ मतदार आहेत. पुरंदर मतदार संघात ४१३ मतदान केंद्रे, पुरुष मतदार २ लाख २८ हजार ५७०, महिला २ लाख ७ हजार ८१३ आणि तृतीयपंथीय ३१ असे ४ लाख ३६ हजार ४१४ मतदार आहेत.

भोर मतदार संघात ५६४ मतदान केंद्र, पुरुष २ लाख १९हजार ३३१, महिला १लाख ९३ हजार ७९ आणि तृतीयपंथीय ४ असे ४ लाख १२ हजार ४१४ मतदार आहेत. मावळ मतदार संघात ४०२ मतदान केंद्र, पुरुष १लाख ९३ हजार ३७, महिला १ लाख ८२ हजार ७२० आणि तृतीयपंथीय १३ असे ३ लाख ७५ हजार ७७० मतदार आहेत.

चिंचवड मतदार संघात ५६१ मतदान केंद्र, ३ लाख ३२ हजार ५९२ पुरुष, २ लाख ९४ हजार ७९७ महिला आणि तृतीयपंथीय ४८ असे ६ लाख २७ हजार ४३७ मतदार आहेत. पिंपरी मतदार संघात ३९८ मतदान केंद्रे, पुरुष १ लाख ९८ हजार २३८, महिला १ लाख ७८ हजार ९८३ आणि तृतीयपंथीय ३० असे ३ लाख ७७ हजार २५१ मतदार आहेत.

भोसरी मतदार संघात ४८३ मतदान केंद्रे, पुरुष मतदार ३ लाख ५ हजार ८५५, महिला २ लाख ५३ हजार ९ आणि तृतीयपंथीय ९५ असे ५ लाख ५८ हजार ९५९ मतदार आहेत. वडगांव शेरी मतदार संघात ४३७ मतदान केंद्रे, पुरुष २लाख ४७ हजार ६३८, महिला २ लाख २८ हजार ८०० आणि तृतीयपंथीय १०० असे एकूण ४ लाख ७६ हजार ५३८ मतदार आहेत.

शिवाजीनगर- २८० मतदान केंद्रे, पुरुष १ लाख ४३ हजार ६, महिला १ लाख ३८ हजार ७८३ आणि तृतीयपंथीय ४२ असे २ लाख ८१ हजार ८३१ मतदार, कोथरूड- ३८७ मतदान केंद्रे, पुरुष २ लाख २० हजार ४०३, महिला २ लाख ६५५ आणि तृतीयपंथीय २१ असे ४ लाख २१ हजार ७९ मतदार आहेत.

खडकवासला मतदार संघात ५०५ मतदान केंद्रे, पुरुष मतदार २ लाख ९० हजार ३४४, महिला २ लाख ५५ हजार ५१० आणि तृतीयपंथीय ३९ असे ५ लाख ४५ हजार ८९३ मतदार, पर्वती मतदार संघात ३४४ मतदान केंद्रे, पुरुष १ लाख ७६ हजार ४०५, महिला १ लाख ६८ हजार २४२ आणि तृतीयपंथीय ९२ असे एकूण ३ लाख ४४ हजार ७३९ मतदार आहेत.

हडपसर मतदार संघात ५२५ मतदार केंद्रे, पुरुष मतदार ३ लाख १२ हजार ३७७, महिला २ लाख ७८ हजार १६३ आणि तृतीयपंथीय ७१ असे ५ लाख ९० हजार ६११ मतदार आहेत. पुणे कॅन्टोन्मेंट मतदार संघात २७४ मतदान केंद्रे असून यात १ लाख ४५ हजार ९७६ पुरुष, १ लाख ४० हजार ५०७ महिला आणि ३५ तृतीयपंथीय असे २ लाख ८६ हजार ५१८ मतदार आहेत. कसबा पेठ मतदार संघात २६८ मतदान केंद्रे, पुरुष मतदार १ लाख ३८ हजार २८, महिला १ लाख ४० हजार ५४३ आणि तृतीयपंथीय ३५ असे २ लाख ७८ हजार ६०६ मतदार आहेत.